गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक २२१ वा ● रविवार ३१ डिसेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 221 | Date : 31/12/2023 | blow :Sunday | Page 4 | Price 4

संपूर्ण देशात २२ जानेवारीला दिवाळी साजरी करा, पंतप्रधान मोदींचे राममभक्तांना आवाहन

मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी ३० डिसेंबर रोजी अयोध्येतील महर्षि वाल्मिकी विमानतळ, रेल्वे स्थानक आणि इतर अनेक विकास कामांचे उद्घाटन केले. तसेच यावेळी त्यांनी २२ जानेवारी रोजी लोकांना अयोध्येत न येण्याचं देखील आवाहन केलं आहे. यावर त्यांनी म्हटलं की, तुम्ही मागील ५५० वर्ष वाट पाहिली आता आणखी थोडा वेळ वाट पाहा. पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं की, २२ जानेवारीच्या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी स्वतः अयोध्येत येण्याची इच्छा प्रत्येकाला आहे. परंतु प्रत्येकाला येणे शक्य नाही. त्यामुळे माझी सर्व राम भक्तांना विनंती आहे की, २२ जानेवारीला औपचारिक कार्यक्रम झाल्यावर त्यांनी त्यांच्या सोयीनुसार अयोध्येत यावे.

या भव्य सोहळ्याची तयारी वर्षानुवर्षे सुरू असून त्यात कोणताही व्यत्यय येऊ नये. येथे गर्दी करू नका, कारण मंदिर कुठेही जात नाही. हे शतकानुशतके टिकेल. या सोहळ्यासाठी मोजक्याच लोकांना आमंत्रित करण्यात आले आहे. त्यामुळे ज्यांना आमंत्रण देण्यात आले आहे त्यांनी फक्त अयोध्येत यावं, असं आवाहन पंतप्रधान मोदी यांनी केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही राम मंदिर प्राणप्रतिष्ठानिमित्त घरोघरी श्री राम ज्योती प्रज्वलित करण्याचे आवाहन केले आहे. हा ऐतिहासिक क्षण सुदैवाने आपल्या सर्वांच्या जीवनात आला आहे. या निमित्ताने सर्व १४० कोटी देशवासीयांनी २२ जानेवारी रोजी आपल्या घरी श्री राम ज्योती प्रज्वलित करून दिवाळी साजरी करावी, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं. । पान २ वर

'सुकन्या समृध्दी'च्या व्याजदरात वाढ

नवी दिल्ली : केंद्र सरकारने नवीन वर्षापूर्वीच नागरिकांना एक मोठी भेट दिली आहे. जानेवारी-मार्च २०२४ तिमाहीसाठी सुकन्या समृद्धी योजना आणि ३ वर्षाच्या मुदत ठेवीसारख्या छोट्या बचत योजनांवरील व्याजदरात वाढ करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वीच सरकारने ही घोषणा केली आहे. अर्थ मंत्रालयाने जारी केलेल्या या परिपत्रकानुसार, आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या चौथ्या तिमाहीसाठी, सुकन्या समृद्धी योजनेचे व्याजदर ८ टक्क्यांवरून ८.२ टक्के करण्यात आले आहेत.

याशिवाय ३ वर्षांच्या मुदतीच्या ठेवींवरील व्याज ७ टक्क्यांवरून ७.१ टक्के करण्यात आले आहे. १ जानेवारी २०२४ ते ३१ मार्च २०२४ पर्यंत बचत ठेवींवर ४ टक्के व्याज मिळेल. १ वर्षाच्या ठेवीवर ६.९ टक्के व्याज, २ वर्षांच्या मुदतठेवीवर ७ टक्के व्याज आणि ५ वर्षांच्या ठेवीवर ७.५ टक्के व्याज मिळेल.

५ वर्षांच्या आवर्ती ठेवींवर ६.७ टक्के व्याज कायम ठेवण्यात आले आहे. राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रावरील व्याजदर ७.७ टक्के कायम ठेवण्यात आला आहे. किसान विकास पत्रामध्ये गुंतवणूक करणाऱ्यांना ७.५ टक्के व्याज मिळेल आणि ते ११५ महिन्यांत परिपक्व होईल.

नव्या वर्षात वीज दरवाढीचा शॉक, ३७५ कोटी ग्राहकांकडून वसूल करायला परवानगी

मुंबई: नव्या वर्षाच्या सुरुवातीलाच ग्राहकांना वीज दरवाढीचा शॉक बसण्याची शक्यता आहे. विद्युत नियामक आयोगाने महावितरणला अतिरिक्त उत्पादन खर्चाचे ३७५ कोटी ग्राहकांकडून वसूल करायला परवानगी दिली आहे. त्यामुळे इंधन संयोजन शुल्काच्या नावाखाली श्रेनिहाय ग्राहकांना १० ते ७० पैशापर्यंत प्रतियुनिट अधिकचे मोजावे लागणार आहे. हे इंधन संयोजन शुल्क पुढील १० महिने ग्राहकांना द्यावे लागणार असल्याची माहिती समोर आली आहे.

नवीन वर्षात ग्राहकांना वीज दर वाढीचा शॉक बसण्याची शक्यता आहे. कारण विद्युत नियामक आयोगाने महावितरणला अतिरिक्त उत्पादन खर्चाचे ३८५.९९ कोटी ग्राहकांकडून वसूल करायला परवानगी दिली आहे. त्यासाठी इंधन संयोजन शुल्काच्या नावाखाली श्रेनिहाय ग्राहकांना १० पैसे ते ७० पैशापर्यंत प्रतियुनिट अधिकचे मोजावे लागणार आहेत. हे इंधन संयोजन शुल्क ग्राहकांना पुढील १० महिने ग्राहकांना द्यावे लागणार आहे. सध्या महावितरणने ग्राहकांसाठी पंचवार्षिक योजने अंतर्गत पाच वर्षाचे विजेचे दर आधीच । पान २ वर

ओबीसीतून आरक्षण मिळेपर्यंत मुंबई सोडायची नाही, हाच नवीन वर्षाचा संकल्प

मुंबई : राज्यातील गोरगरीब गरजवंत मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळेपर्यंत मुंबई सोडायची नाही, हाच नवीन वर्षाचा संकल्प असल्याचे मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगेपाटील यांनी आज पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले. जरांगे यांच्या शिष्टमंडळाने मुंबईतल्या शिवाजी पार्क, बीकेसी आणि आझाद मैदान या तिन्ही मैदानाची पाहणी केली. यावर ते म्हणाले की, मुंबईत जाणाऱ्या मराठ्यांची संख्या मोठी असल्याने ही तिन्ही मैदाने मराठा आरक्षण आंदोलनासाठी । पान २ वर

आशिया खंडातील सर्वात मोठ्या क्लस्टर प्रकल्पाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन

मुंबई : ठाणे शहरातील किसननगर भागात उभारण्यात येणाऱ्या आशिया खंडातील सर्वात मोठ्या महत्त्वाकांक्षी आणि ऐतिहासिक क्लस्टर पुनर्विकास योजनेतील नवीन प्रकल्पाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शनिवारी भूमिपूजन झाले. ठाणे शहरातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनक्षेत्रामध्ये निसर्ग पर्यटनाच्या सुविधा विकसित करण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या 'आनंदवन' उपक्रमातील कामांचे भूमिपूजनही यावेळी करण्यात आले. येऊर येथील नेचरपार्क आणि इतर विविध विकासकामांचा ई-शुभारंभदेखील यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला.

क्लस्टरसाठी अनेक वर्षे संघर्ष करावा लागला, साईराज बिल्डिंगची दुर्घटना अजूनही लक्षात आहे. त्यातील १८ जण मृत्युमुखी पडले, ही घटना माझ्या मनाला चटका लावून गेली. धोकादायक इमारती सर्वांनाच काळजी टाकणाऱ्या असतात. या पार्श्वभूमीवर ही योजना राबविण्याचा संकल्प केला. काही इमारती अनधिकृत जरी असल्या तरी त्यातील जिवंत माणसे,

त्यांचा जीव महत्त्वाचा, ही माणुसकीची भावना महत्त्वाची, या भावनेतूनच क्लस्टर योजनेचा जन्म झाला. क्लस्टर योजनेत काही त्रुटी होत्या मात्र देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्या त्रुटी दूर करण्यात त्यांनी मोलाचे सहकार्य केले असे सांगून महापालिका आयुक्त, सिडको व्यवस्थापकीय संचालक, जिल्हाधिकारी आणि वनविभाग यांनी संयुक्तपणे ही योजना यशस्वीपणे पूर्णत्वास आणावी असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

क्लस्टर पुनर्विकास योजनेच्या पहिल्या टप्प्यात साडेदहा हजार घरांचे काम पूर्णत्वास जाणार आहे, पुढील काम हे दोन टप्प्यातच पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. क्लस्टर योजनेसाठी पूर्वी काम केलेल्या कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी मी कटिबद्ध आहे. पंधराशे हेक्टर भूखंडावर होणारा हा क्लस्टर पुनर्विकास प्रकल्प भारतातीलच नव्हे तर आशियातील पहिला इतका मोठा क्लस्टर पुनर्विकास प्रकल्प आहे असे सांगून समाजासाठी जगण्याची धर्मवीर आनंद दिघे साहेबांची शिकवण घेवून मी आता जगतोय आणि मुख्यमंत्रीपदाचा । पान २ वर

वटवृक्ष मंदिरात हर्षोल्हासाने होणार नुतन वर्षाचे स्वागत

अक्कलकोट/प्रतिनिधीः नुतन वर्षाच्या स्वागताकरीता पाश्चिमात्य संस्कृतीच्या चालीरितींना फाटा देत कोल्हापूर, मुंबई व राज्यातील विविध भागातील स्वामी भक्तांच्या वतीने येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानात विविध धार्मिक कार्यक्रमांनी हर्षोल्हासात नुतन वर्षाचे स्वागत होणार असल्याची माहिती मंदिर समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी दिली.

रविवार दिनांक ३१ डिसेंबर रोजी सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी व सोमवार दिनांक १ जानेवारी २०२४ रोजी नुतन वर्षाचे स्वागत करण्यासाठी व नविन वर्षाच्या शुभमुहूर्तावर श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेण्यासाठी कोल्हापूर, मुंबई, पुणे, औरंगाबाद, अहमदनगर, धुळे, नागपूर, नाशिक, रत्नागिरी, सोलापूर, सांगली इत्यादी व राज्याच्या कानाकोपऱ्यातून व देशभराच्या अन्य ठिकाणांहून बरेच स्वामी भक्त येणार आहेत.

दिनांक ३१ डिसेंबर २०२३ रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ७ या वेळेत ओम स्वामी चैतन्य भजनी मंडळ यांचे भजन, व विविधरुपी सोंगी भारूड इत्यादी कार्यक्रम देवस्थान परिसरात

होतील. रात्री ७:४५ वाजता महाराजांच्या शेजारतीस सुरुवात होईल. । पान २ वर

श्री सिद्धेश्वर महायात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी सर्वांनी परस्परात समन्वय ठेवावा : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर शहरात दिनांक १ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२४ या कालावधीमध्ये होम मैदान येथे श्री सिद्धेश्वर महायात्रा (गड्डा यात्रा) भरते. तर दिनांक १२ ते १६ जानेवारी २०२४ या कालावधीत अक्षता सोहळा सह अन्य धार्मिक विधी पार पाडले जातात. तरी ही सिद्धेश्वराची महायात्रा यशस्वी करण्यासाठी मंदिर समिती तसेच सर्व शासकीय यंत्रणांनी परस्परात योग्य समन्वय ठेवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित श्री सिद्धेश्वर महायात्रा आयोजनाच्या अनुषंगाने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या बैठकीत जिल्हाधिकारी मार्गदर्शन करत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे, सोलापूर प्रांताधिकारी सदाशिव पडदूने, जिल्हा अन्नधान्य वितरण अधिकारी सुमित खाडे, तहसीलदार महसूल दत्तात्रय मोहोळे, तहसीलदार सैफान नदाफ, महापालिकेचे सिटी इंजिनियर श्री. चलवदी, मंदिर समितीची पंच कमिटी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढेले, विभागाचे अधिकारी यांच्यासह अन्य संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, श्री सिद्धेश्वर महायात्रा कालावधीत भाविकांना कोणताही त्रास होणार नाही या दृष्टीने संपूर्ण नियोजन करावे. मंदिर परिसर, होम मैदान व शहरात कोठेही अस्वच्छता राहणार नाही याचे नियोजन करावे. पोलीस विभागाने वाहतुकीचे व गर्दीचे नियंत्रण व्यवस्थितपणे करावे यात कोणत्याही प्रकारची त्रुटी राहणार नाही याची दक्षता घ्यावी. दिनांक १२ ते १६ जानेवारी या कालावधीत श्री सिद्धेश्वर यांचे अक्षता सोहळा व अन्य धार्मिक विधी पार पाडणार आहेत व याच कालावधीत गर्दी जास्त राहणार असल्याने पोलीस विभागाने बंदोबस्त चोखपणे ठेवावा असेही निर्देश त्यांनी दिले.

संपूर्ण यात्रा कालावधी पोलीस विभाग व मंदिर समितीने पार्किंगची चोख व्यवस्था ठेवावी प्रदूषण नियंत्रण मंडळाने या परिसरात प्रदूषण प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात तसेच प्रदूषण पातळीवर बारीक लक्ष ठेवावे. यात्रा कालावधीत व यात्रा झाल्यानंतर । पान २ वर

अक्कलकोट येथे विवेकानंद प्रतिष्ठान वतीने ३० मार्चला सामुदायिक विवाह सोहळा

अक्कलकोट/प्रतिनिधी : विवेकानंद प्रतिष्ठान अक्कलकोट तर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही अध्यक्ष तथा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली ३० मार्च २०२४ रोजी सायं. ६.४१ वाजता गोरज मुहूर्तावर सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाच्या सोहळ्यात जास्तीत जास्त जोडप्यांचा विवाह लावण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

विवेकानंद प्रतिष्ठान अक्कलकोट सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, पर्यावरण, आरोग्य, क्रीडा, अध्यात्म आदी अनेक क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहे. विवेकानंद प्रतिष्ठानच्या माध्यमातून समाजातील सर्व स्तरातील लोकांना प्रोत्साहन देण्याचे कार्य निरंतर सुरु आहे. समाजातील सर्व स्तरातील लोकांना सामाजिक उपक्रमातून एकत्रित आणून समाजात बंधुत्व निर्माण करण्याचा प्रयत्न विवेकानंद प्रतिष्ठान करीत आहे. लग्न हा भारतीय जीवन संस्कृतीचा कणा आहे. विवाह हा एक जीवनातील महत्वाचा टप्पा आहे. आजच्या महागाईच्या काळात सर्वसामान्यांना लग्नाचा खर्च व नियोजन करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. समाज ऋण व विवाह वेळी येणाऱ्या अडचणी या सर्व गोष्टींचा विचार करून आ.सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली विवेकानंद प्रतिष्ठानच्या माध्यमातून सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करीत आहेत. आजपर्यंत ५५६ जोडपी विवाह सोहळ्यामध्ये विवाहबद्ध झाली आहेत व अनेक वधू-वरांच्या संसाराला गती दिली आहे. विवेकानंद प्रतिष्ठान सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे हे १२ वे वर्ष आहे. विवाह सोहळ्यासाठी

अक्कलकोट शहरासह तालुक्यात, स्वामी विवेकानंद नागरी पतसंस्था, मल्टीस्टेट, लोकमंगल सुपर बाजार अक्कलकोट आदी ठिकाणी माहिती केंद्राची व्यवस्था करण्यात आली आहे. या विवाह सोहळ्यात नोंदणी केलेल्या वधू-वरास विवाहाचे कपडे, वऱ्हाडी मंडळीच्या भोजनाची सोय, स्वतंत्र मेकअप करण्याची व्यवस्था, वधूस मणी मंगळसूत्र व जोडवे देण्यात येतात. ताट, वाटी, ग्लास प्रत्येकी ५ नग, स्टील हंडा, स्टील डबा, तांब्या आदी संसारोपयोगी साहित्य दिले जाते. वधू- वरांची अक्कलकोट शहरातून मार्गावरून वरात काढली जाते. प्रत्येकाच्या धर्माप्रमाणे विवाह लावून दिले जातात. नवदाम्पत्यांना संसाराबद्दल योग्य समुपदेशन वैद्यकीय मार्गदर्शन केले जाते. सुखी संसारातून पहिली मुलगी जन्मात आल्यास मुलीच्या नावे २००० ची ठेव पावती देण्यात येते. विवाह सोहळा शिस्तबद्ध सुरेखरीतीने पार पडण्यासाठी प्रतिष्ठानच्या सदस्यांची वेगवेगळे समिती गठीत केल्या जातात त्याप्रमाणे प्रतिष्ठानचे सर्व सदस्य कार्य करीत असतात.

तरी या विवाह सोहळ्यामध्ये जास्तीत जास्त विवाह इच्छुकांनी नोंदणी करावी असे आवाहन विवेकानंद प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे. विवाह नाव नोदणी अंतिम दिनांक २० मार्च २४ पर्यंत असेल. नाव नोंदणीसाठी विवेकानंद प्रतिष्ठान कार्यालय, मेन रोड,अक्कलकोट येथे संपर्क करावेत.

या पत्रकार परिषदेस मल्लिकार्जुन मसुती,अशोक येणगुरे, विलास कोरे, गुरुपादप्पा आळगी, नितीन पाटील, निनाद शहा, विक्रम शिंदे, निनाद शहा, महेश कापसे, अमोल कोकाटे,संतोष जिरोळे, राजशेखर उबराणीकर, मनोज कल्याणशेट्टी,शिवशरण जोजन, निरंजन शहा, सचिन गडसिंग, राजकुमार झिंगाडे, प्रकाश पाटील, ऋषिकेश लोणारी,शरणू कापसे, अशपाक शेख,सिद्धाराम टाके, जगन्नाथ चौधरी, चंद्रकांत दसले याच्या सह प्रतिष्ठान सदस्य उपस्थित होते.

संपादकीय

समान शिक्षा व्हावी..

लोकशाहीचे आधारस्तंभ व मंदिर समजल्या जाणाऱ्या संसदेत अचानक घुसखोरी होऊन संसदेत गोंधळ उडतो ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. अचानक दोन जणांनी नवीन संसद भवनाची सुरक्षा भेदल्याने देशभरात खळबळ उडालीच, सोबतच याचे पडसाद जगातही दिसून आले. जे सहा युवक संसद भवनाच्या परिसरात किंवा आत गेले त्यांना कर्नाटकातील भाजपचे खासदार प्रताप सिन्हा यांच्यामार्फत पास दिल्याचे सांगितले जाते. प्रताप सिन्हा म्हणतात की, आपण या तरुणांना ओळखत नव्हतो. यामुळे प्रश्न उद्भवतो की आपण जर या युवकांना ओळखत नाही तर एवढ्या मोठ्या लोकशाहीच्या मंदिराचे पास का देण्यात आले? यामुळे संसद भवनात किंवा परिसरात तरुणांमार्फत जे ही घृणीत कृत्य घडले त्याचा पहिला दोषी पास देणारा खासदारच आहे, असे मी समजतो. कारण खासदारांनी पास दिलाच नसता तर असे कलंकित कृत्य घडलेच नसते. सोबतच यात सुरक्षा यंत्रणेचीसुध्दा मोठी चूक दिसून येते. सुरक्षा यंत्रणेमार्फत जर त्या तरुणांची कसून तपासणी झाली असती तर त्यांना जागीच पकडून कारवाई करता आली असती व हा अनुचित प्रकार टाळता आला असता. त्यामुळे संसद भवनाच्या परिसरात तरुणांमार्फत जे धक्कादायक कृत्य झाले त्याचे मुख्य दोषी पास देणारे खासदारच आहेत व नंतर सुरक्षा यंत्रणा आहे. त्यामुळे सरकारने पास देणाऱ्या खासदाराला ताबडतोब निलंबित करायला पाहिजे. सोबतच येणाऱ्या निवडणुकीतही त्याला निवडणूक लढण्याचा अधिकार नसावा, पण इथे उलटे होताना दिसत आहे. जे या घुसखोरीच्या चौकशीची मागणी करीत आहेत, त्यांनाच निलंबित करण्यात आले. त्यात पुन्हा ही संख्या थोडी थोडकी असती तर समजण्यासारखे होते, पण ही संख्या लक्षणीय असल्यामुळे देशातील जनतेला आश्चर्याचा धक्का बसला. पाच राज्यांच्या झालेल्या विधानसभांच्या निवडणुकांमध्ये तीन राज्यांमध्ये भाजपची सरशी झाली. त्यामुळे त्यांचा विश्वास वाढला, पण त्याचबरोबर कर्नाटकातील काँग्रेसच्या विजयामुळे विरोधकांच्या पंखात जे बळ आले होते ते ओसरले. त्यात पुन्हा पाच राज्यांच्या निवडणुकांमध्ये काँग्रेसने जी एकला चलोची भूमिका घेतली, त्यामुळे विरोधकांच्या एकीची बेकी झाली आहे. त्यामुळे बेरीज होण्याच्या जागी वजाबकी होताना दिसत आहे. विरोधकांच्या या बेकीमुळे सत्ताधाऱ्यांनाही त्यांची किंमत वाटेनाशी झाली आहे. त्यामुळे एखाद्या शिक्षकाने वर्गात दंगा करणाऱ्या मुलांना वर्गाच्या बाहेर काढण्याची शिक्षा द्यावी तसे चित्र सध्या संसदेत दिसत आहे.

विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी प्रशासन सज्ज

जिल्हाधिकाऱ्यांकडून परिसरातील सुविधांचा आढावा

पुणे/प्रतिनिधी : पेरणे फाटा येथे १ जानेवारी रोजी आयोजित विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी प्रशासनाने आवश्यक सर्व तयारी पूर्ण केली असून येणाऱ्या अनुयायांसाठी तयार करण्यात आलेल्या सुविधांचा जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख यांनी परिसराला भेट देऊन आढावा घेतला.

यावेळी बार्टीचे महासंचालक सुनील वारे, विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हा पोलीस अधीक्षक अंकीत गोयल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, बार्टीचे विभागप्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण,निबंधक इंदिरा अस्वार आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ.देशमुख यांनी शिक्रापूर येथील वाहनतळ आणि विजयस्तंभ परिसराची पाहणी केली. स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याची पुरेशा सुविधा राहील याची दक्षता घ्यावी. नागरिकांना माहिती देण्यासाठी सूचना फलक ठिकठिकाणी लावावेत. गर्दीचे नियोजन योग्य पद्धतीने होण्यासाठी पीएमपीएमल बसेसच्या फेऱ्या सुरू राहतील याची दक्षता घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ.देशमुख यांनी दिल्या.

सोहळ्यासाठी प्रशासन सज्ज

विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी प्रशासन सज्ज झाले असून यावर्षी अधिक अनुयायी येण्याची शक्यता लक्षात घेवून अधिक प्रमाणात सुविधा करण्यात आल्या आहेत. २९ ठिकाणी आरोग्य कक्ष उभारण्यात आले आहे. २० फिरते दूचाकी आरोग्य पथक, ५० रुग्णवाहिका ९० तज्ज्ञ डॉक्टर आणि २०० आरोग्य कर्मचारी नियुक्त केलेले आहे. खाजगी रुग्णालयात १०० खाटा आरक्षित करण्यात आल्या आहेत. पुरेशा प्रमाणात औषधसाठादेखील ठेवण्यात आला आहे.

स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरिता दीडशे पाण्याच्या टँकरची व्यवस्था करण्यात आली आहे. मानवंदना देण्यासाठी येणाऱ्या माता-भगिनींची काळजी घेण्यात आली असून एकूण पाच हिरकणी कक्ष उभारण्यात येत आहेत. हिरकणी कक्षामध्ये स्तनदा माता व ज्येष्ठ महिला यांना तसेच त्यांच्या समवेत असलेले लहान बालकांसाठी विश्रांती तसेच बालकांच्या मनोरंजनाकरीता खेळणी साहित्य व खाऊ ठेवण्यात आला आहे. या ठिकाणी स्वतंत्र महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.परिसरातील विविध ठिकाणी एकूण २ हजार २०० तात्पुरत्या शौचालयांची उभारणी करण्यात आलेली आहे. वापराच्या पाण्यासाठी ४० टँकर आणि स्वच्छतेसाठी ४० सक्शनमशीन व १५ जेटींग मशीन ठेवण्यात आले आहेत. रस्त्यावर कचरा साचू नये याकरीता ५०० कचराकुंड्या ठेवण्यात आल्या आहेत. स्वच्छतेसाठी २०० सफाई कामागार नियुक्त करण्यात आले आहेत. कचरा उचलण्याकरिता ८० घंटागाड्या उपलब्ध करण्यात आल्या आहेत.पोलिसांकडूनही चोख बंदोबस्त ठेवण्यात आला असून नागरिकांना सुचना देण्यासाठी ठिकठिकाणी ध्वनीक्षेपकांची व्यवस्था (पब्लीक ड्रेस सिस्टिम) करण्यात आली आहे. सीसीटीव्हीद्वारे परिसरावर नजर राहणार असून त्यासाठी सुसज्ज नियंत्रण कक्ष उभारण्यात आला आहे. पुरेशा प्रमाणात पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्तांकडून सुरक्षा व्यवस्थेचा आढावा

पुणे शहर पोलीस आयुक्त रितेश कुमार यांनी विजयस्तंभ परिसराची पाहणी करुन सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला. यावेळी प्र. सह पोलीस आयुक्त रामनाथ पोकळे, अपर पोलीस आयुक्त रंजन कुमार शर्मा, अरविंद चावरिया आदी उपस्थित होते.

ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'द प्रॉब्लेम ऑफ रुपी' या ग्रंथाच्या शताब्दी वर्षानिमित्त बार्टी संस्थेचे महासंचालक सुनिल वारे यांच्या संकल्पनेतून विजयस्तंभ परिसरात बार्टी संस्थेच्यावतीने पुस्तकांचे ३०० स्टॉल उभारले आहेत. बार्टी संस्थेच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतर महापुरुषांच्या जीवनावरील मौल्यवान पुस्तके ८५ टक्के सवलतीच्या दरात अनुयायांना वितरण करण्यात येणार आहेत.'द प्रॉब्लेम ऑफ रुपी, भारताचे संविधान, संविधान उद्देशिका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे खंड, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, बुद्ध आणि त्याचा धम्म आदी पुस्तके उपलब्ध असून अनुयायांनी बार्टीच्या दालनाला भेट देऊन या पुस्तकाचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभाग प्रमुख डॉ.सत्येंद्रनाथ चव्हाण यांनी केले आहे.

सोहळ्याचे थेट प्रक्षेपण

सोहळ्यास उपस्थित राहू न शकणाऱ्या नागरिकांना घरबसल्या सोहळा पाहता यावा यासाठी सह्याद्री वाहिनीवरून १ जानेवारी रोजी सकाळी ६ ते दुपारी १२ वाजेपर्यंत सोहळ्याचे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. सकाळी ६.३० वाजता मान्यवर पाहुणे विजयस्तंभास अभिवादन करतील. ७.३० वाजता समता सैनिक दल, महार रेजिमेंट सेवानिवृत्त सैनिक आणि सैनिक दलातर्फे मानवंदना दिली जाईल. सकाळी ९.३० वाजता 'डॉ.बी.आर. आंबेडकर विज्डम बुकफेअर'चे उद्घाटन होईल, अशी माहिती बार्टीच्यावतीने देण्यात आली आहे.

काँग्रेसने कायम दलितांना दाबण्याचे काम केले,काँग्रेसने दलितांना न्याय दिला नाही

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे मल्लिकार्जुन खरगे यांना प्रत्युत्तर

मुंबई: दलितांना न्याय देण्याचे काम प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात होत आहे. काँग्रेसच्या सत्ता काळात दलितांना न्याय मिळाला नाही.काँग्रेसच्या सत्ता काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाचे कोणतेही काम कधीही झाले नाही.जेव्हा जेव्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या योगदानाचा सन्मान करण्याची वेळ आली तेव्हा तेव्हा काँग्रेसने धोका दिला आहे. असे प्रत्युत्तर आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खरगे यांना दिले.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची अनेक स्मारके उभारली आहेत. अनेक योजनांद्वारे दलितांच्या उत्कर्षाचे काम होत आहे. त्यामुळे नरेंद्र मोदींच्या काळात दलितांना न्याय मिळणार नसल्याचा मल्लिकार्जुन खरगे यांनी केलेला आरोप निराधार आणि चुकीचा आहे. उलटपक्षी काँग्रेसनेच अनेक वर्षे दलितांना दाबण्याचे काम करीत आहे असा टोला ना.रामदास आठवले यांनी काँग्रेस ला लगावला.

दिल्लितील १५ जनपथ येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्र,२६अलीपुर रोड येथील निर्वाणभुमी स्मारक,लंडन मधील संग्रहालयरुपी स्मारक आणि मुंबइत इंदु मिल मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्याचे काम केले आहे.त्यामुळे मोदींच्या काळात दलितांना न्याय मिळणार नसल्याचा काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खरगे यांचा आरोप निराधार चुकिचा आहे.उलट काँग्रेसच्या सत्ता काळात दलितांना वर येवू न देण्याचे ,दलितांना दाबण्याचे काम झाले आहे.असे प्रत्यत्तर आज ना. रामदास आठवले यांनी मल्लिकार्जुन खरगे यांना दिले.आज बांद्रा येथे ना. रामदास आठवले यांच्या निवासस्थानी पत्रकाराशी झालेल्या वार्तालापात ना.आठवले बोलत होते.

काँग्रेसने नाईलाज म्हणुन मल्लिकार्जुन खरगे यांना पक्षाध्यक्ष केले आहे.मात्र जेव्हा कर्नाटकात मल्लिकार्जुन खरगे यांना मुख्यमंत्री करण्याची वेळ आली तेव्हा काँग्रेसने दलित नेते म्हणुन मल्लिकार्जुन खरगे यांना मुख्यमंत्री केले नाही.दलित नेते म्हणुन मल्लिकार्जुन खरगे यांना काँग्रेसने वर येवू दिले नाही त्यांना दाबले.दलितांना वर येण्यापासून रोखण्याचे,दलितांना दाबण्याचे काम काँग्रेसच करित आहे.असा घणाघात ना.रामदास आठवले यांनी आज केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा सन्मान काँग्रेसने कधी ही केला नाही उलट त्यांचा दोन वेळा लोकसभा निवडणुकित पराभव केला. काँग्रेसला त्यांच्या सत्ता काळात जातीभेद मिटवण्यास यश मिळाले नाही.जातीवाद संपवण्यात काँग्रेस अपयशी ठरले त्यामुळे आज ही दलितांवर अत्याचार होत आहेत असे

ना.रामदास आठवले यावेळी म्हणाले.

पान १ वरुन

संपूर्ण देशात २२ जानेवारीला दिवाळी

यावेळी पंतप्रधान मोदींनी अयोध्येतील जनतेला शहर स्वच्छ करण्याचे आवाहन केले. अयोध्या आता लाखो पाहुण्यांचे स्वागत करण्यासाठी सज्ज असली पाहिजे. अनंतकाळपर्यंत पर्यटक येथे येतच राहतील. अयोध्येला देशातील सर्वात स्वच्छ शहर बनवण्याची शपथ अयोध्येतील जनतेला घ्यावी लागेल, असं पंतप्रधान मोदी म्हणाले.

अयोध्येमधील विविध विकास कामांचे पंतप्रधान मोदी यांनी यावेळी लोकार्पण केले. यावेळी त्यांनी म्हटलं की, आज मला अयोध्या धाम विमानतळ आणि रेल्वे स्थानकाचं उद्घाटन करण्याचं सौभाग्य मिळालं आहे. मला आनंद होतोय की अयोध्या विमानतळाचं नाव हे महर्षि वाल्मिकी यांच्यावरुन ठेवण्यात आले. येथे श्री रामाचे भव्य मंदिर उभारल्यानंतर येथे येणाऱ्या लोकांच्या संख्येत मोठी वाढ होणार आहे. हे लक्षात घेऊन आमचे सरकार अयोध्येत हजारो कोटी रुपयांची विकासकामे करत आहे आणि अयोध्येला स्मार्ट बनवत आहे.

श्री सिद्धेश्वर महायात्रेच्या यशस्वी

संपूर्ण परिसर स्वच्छ राहील याबाबत महानगरपालिका व मंदिर समितीने योग्य नियोजन करावे. होम मैदानावरील मनोरंजन नगरीबाबत तेथील स्टॉल व अन्य सोयी सुविधा पुरविण्याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी. भाविकाच्या संख्येप्रमाणे आरोग्य पथकाचे नियोजन करावे, अशा सूचना ही जिल्हाधिकारी आशीर्वादाने दिल्या.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे यांनी संपूर्ण यात्रा कालावधी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या निर्देशाप्रमाणे मंदिर समिती व सर्व संबंधित विभागांनी कामकाज पार पाडावे अशा सूचना दिल्या. तर प्रांताधिकारी सदाशिव पडदूने यांनी यात्रा कालावधीत प्रत्येक शासकीय विभागाची तसेच मंदिर समितीच्या विविध जबाबदाऱ्या व त्यांनी करावयाची कार्यवाही याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच पंचकमिटी सदस्यांनी मंदिर समितीच्या वतीने मंदिर परिसरात भाविक यांच्यासाठी करण्यात येत असलेल्या सोयी सुविधांची माहिती दिली.

नव्या वर्षात वीज दरवाढीचा ..

निश्चित केले आहेत. मात्र होणार अतिरिक्त खर्च हा इंधन संयोजन दराच्या नावाने वसूल केला जातो. यावेळेस ही दरवाढ बीपीएल व कृषी ग्राहकांना देखील भरावी लागणार आहे. विजेच्या वापराच्या श्रेणी नुसार बीपीएल ग्राहकांना १० पैसे प्रति युनिट, १ ते १०० युनिट वापर असलेल्या ग्राहकांना २५ पैसे प्रति युनिट, १०० ते ३०० युनिट वापरणाऱ्या ग्राहकांना ४५ पैसे प्रति युनिट व ३०० पेक्षा जात युनिटचा वापर करणाऱ्या ग्राहकांना ६५ पैसे प्रति युनिट इंधन समायोजन शुल्क मोजावे लागणार आहे. त्यामुळे नवीन वर्षात ग्राहकांच्या खिशाला वीज दर वाढीने कात्री बसणार आहे. महावितरण २०१९ पासून आतापर्यंत वीज खरेदीला नियंत्रणात ठेवू शकले नाही. कंपनीने यावर २६४८३ कोटी रूपये अतिरिक्त खर्च केले आहे. कोविड काळ सोडाला तर वर्ष २०१९-२० ला ५ हजार ९७७ कोटी, वर्ष २०२१-२२ ला १० हजार ५४१ कोटी व वर्ष २०२२-२३ ला ११ हजार ५२४ अतिरिक्त खर्च झाला आहे.

चालू हंगामाचा अतिरिक्त खर्च ३८६.९९ कोटी झाला आहे. या अतिरिक्त खर्चासाठी महावितरण कडून आयाती कोळशाच्या वाढलेल्या किमती व त्यामुळे खुल्या बाजारात वाढलेले विजेचे दर व इतर खर्च करणीभूत असल्याचे महावितरण कडून सांगितले जात आहे व ही तूट ग्राहक किवां सरकार कडूनच भरून काढली जाऊ शकते . विद्युत नियामक आयोगाने ग्राहकांकडून हा अतिरिक्त खर्च करायला परवानगी दिल्याचे महावितरण कडून सांगण्यात आले आहे.

वटवृक्ष मंदिरात हर्षोल्हासाने..

रात्री १० ते पहाटे ४ या वेळेत कोल्हापूर, मुंबई, पुणे येथील भजनी मंडळाचे नविन वर्षाच्या स्वागताचे भजन व भावभक्तीगीतांचा कार्यक्रम देवस्थान व परिसरात होतील. दि: ३१ डिसेंबर रोजी रात्री १२ वाजता कोल्हापूर व मुंबई येथील स्वामी भक्तांच्या वतीने गोड प्रसादाचे पदार्थ वाटप करुन व फटाक्यांची आतषबाजी करुन असंख्य स्वामी भक्तांच्या मुखाने 'अवधुत चिंतन श्री गुरुदेवदत्त सदगुरु स्वामी समर्थ महाराज की जय' या जयघोषाने सन २०२४ या नविन वर्षाचे स्वागत करुन उपस्थित सर्व स्वामी भक्त शुभेच्छा व्यक्त करतील व या शुभमुहूर्ताप्रसंगी स्वामींच्या चरणी नतमस्तक होवून येणारे नविन वर्ष सुख समृध्दीने व भरभराटीने व्यतीत व्हावे याकरिता समर्थांच्या चरणी साकडे घालुन पुढील कार्यक्रमास सुरुवात करण्यात येईल. दिनांक १ जानेवारी रोजी सकाळी ८ ते ११ यावेळेत भजन भारूड इत्यादी धार्मिक कार्यक्रम होतील. या प्रसंगी सर्व स्वामी भक्तांच्या सुरक्षिततेकरीता व सर्व स्वामी भक्तांचे दर्शन सुलभतेने होण्याकरीता दिनांक ३१ डिसेंबर व १ जानेवारी रोजी मंदिरात स्वामी भक्तांच्या वतीने नित्यनियमाने होणारे अभिषेक होणार नसून स्वामी भक्तांच्या दर्शनाकरीता देवस्थान विश्वस्त समितीच्या वतीने विशेष नियोजन करण्यात आले आहे. तरी जास्तीत जास्त भाविकांनी नुतन वर्षानिमीत्त आयोजित या कार्यक्रमांचा लाभ घेवून व नुतन वर्षानिमित्त समर्थांचे दर्शन घेवून स्वामींचे आशीर्वाद प्राप्त करुन घ्यावे असे आवाहन मंदिर विश्वस्त समितीच्या वतीने चेअरमन महेश इंगळे यांनी केले आहे.

ओबीसीतून आरक्षण मिळेपर्यंत..

लागतील. मात्र, आमरण उपोषण हे आझाद मैदान किंवा शिवाजी पार्क या दोनपैकी एका मैदानात होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले की, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांबद्दल आम्हाला राग नाही. यामागे माझा कोणताही द्वेषभाव किंवा राग नाही. पहिल्यांदा ते विरोधात बोलले होते, म्हणून मी बोललो होतो. आमचा लढा आरक्षणासाठी आहे. मराठ्यांना आरक्षण मिळेपर्यंत ते निवडणुकाही घेणार नाहीत. देवेंद्र फडणवीस हे मराठा आरक्षणासाठी काम करत आहेत. दरम्यान, जरांगे हे येत्या ४ जानेवारी ते ८ जानेवारीपर्यंत जालना, बीड व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गोदा पट्ट्यातील १२३ गावांचा दौरा करणार आहेत. यावेळी ते मराठा समाज बांधवांच्या गाठीभेटी घेणार आहेत. तसेच गावागावांतून मोठ्या संख्येने मुंबई आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करणार आहेत.

आशिया खंडातील सर्वात मोठ्या..

उपयोग सर्वसामान्यांचे जीवन बदलण्यासाठी करण्याचा प्रयत्न करतोय, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

केंद्र सरकारच्या मदतीमुळे राज्यातील अनेक प्रकल्प मार्गी लागत आहेत, याबद्दल केंद्र शासनाचे आभार मानून मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आणि ठाणे महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने 'आनंदवन' उपक्रम राबविण्यात येणार आहे. 'आनंदवन' ही संकल्पना मानवी जीवनासाठी अत्यंत उपयुक्त असून या योजनेंतर्गत ठाण्यातील पहिल्या टप्प्यात २७ किलोमीटर आणि ५०० मीटर रुंदीचा श्रीनगर ते गायमुख या भागात हा प्रकल्प राबविला जाणार आहे. या माध्यमातून जास्तीत जास्त वृक्षारोपण, ग्रीन पॅच, ऑक्सिजन पार्क, अर्बन फॉरेस्ट हे उपक्रम राबविले जाणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. केवळ इमारती उभ्या करायच्या नाहीत तर नियोजित शहर निर्माण करायचे आहे. येथील लोकांना आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा मिळायला हव्यात. क्लस्टर हा विषय सर्वांच्या जिव्हाळ्याचा असून गरजूंना त्यांच्या हक्काची उत्तम दर्जाची घरे मिळवून देण्यास मुख्यमंत्री या नात्याने मी कटिबद्ध असून 'आनंदवन', 'क्लस्टर' आणि संपूर्ण स्वच्छता मोहिम या अभियानाचा परिणाम निश्चितच येत्या काळात सकारात्मक आणि विकासात्मक दृष्टीने दिसून येईल. भविष्यात ठाण्यातील व राज्यातील इतर शहरांचाही क्लस्टर पुनर्विकासाच्या माध्यमातून विकास केला जाईल, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी जाहीर केले.

नव्यात वर्षात कोरोनाचं सावट! गेल्या २४ तासांत कोरोना ७ रुग्णांचा मृत्यू, ७४३ नवे रुग्ण

नवी दिल्ली : देशभरात कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव पाहता नागरिकांसह प्रशासनाची चिंता वाढली आहे. वर्षाच्या शेवटी देशभरात कोरोनानं पुन्हा डोकं वर काढलं आहे. कोरोनाच्या नवीन गछ.१ सब-व्हेरियंटमुळे डोकेदुखी वाढली आहे. कोरोना विषाणूच्या ओमायक्रॉन व्हेरियंटचा सब-व्हेरियंट JN.1 मुळे सध्या तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे. केरळ, कर्नाटक, दिल्लीसह नऊ राज्यांमध्ये कोरोनाच्या नवीन व्हेरियंटचे रुग्ण आढळून आले आहेत.देशात कोरोनाचे ३९९७ सक्रिय रुग्ण आहेत. गेल्या २४ तासांत देशात कोरोनाचे ७४३ नवीन रुग्ण आढळले आहेत. तर गेल्या २४ तासांत कोरोना संसर्गामुळे ७ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. कोरोना मृतांमध्ये केरळमध्ये ३, कर्नाटकात २ आणि छत्तीसगड आणि तामिळनाडूमध्ये प्रत्येकी १ रुग्णाचा मृत्यू झाल्याची नोंद झाली आहे. देशात कोरोनाचा प्रसार झपाट्याने होत आहे. देशातील जवळपास प्रत्येक राज्यात JN.1 ची प्रकरणे नोंदवली गेली आहेत. भारतात कोरोनाचे उप-प्रकार JN.1 संसर्गाचे पहिले प्रकरण ८ डिसेंबर रोजी केरळमध्ये आढळून आले.दिल्लीमध्ये कोरोनाची परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आहे. पण, केवळमध्ये सातत्याने नवीन रुग्णांची भर पडताना दिसत आहे. प्रशासनाने कोरोना चाचण्यांमध्ये वाढ केली आहे. दिल्लीत शनिवारी कोरोनाच्या ११ नवीन रुग्णांची नोंद झाली असून सात रुग्ण बरे झाले आहेत. सध्या दिल्लीत सक्रिय कोरोना रुग्णांची संख्या ५१ आहे आणि आतापर्यंत दिल्लीतील एकूण कोरोना कोरोना विषाणू आल्यापासून त्याची रूपे वेळोवेळी बदलत आहेत. अलीकडेच, दिल्लीमध्येही कोरोनाच्या ओमायक्रॉन व्हेरिएंटचा सब-व्हेरियंट JN.1 चा पहिला रुग्ण आढळला आहे. मात्र, उपचारानंतर आता हा रुग्ण बरा झाला आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

टाकळीवाडी मध्ये मार्गशीर्ष महिन्यातील पौर्णिमा बौद्ध विहारात उत्साहात संपन्न

गणेश शिदनाळे यांचा वाढदिवसानिमित्त बौद्ध समाज तर्फे सत्कार

टाकळीवाडी/नामदेव निर्मळे : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथे बौद्ध विहार मध्ये मार्गशीर्ष महिन्यातील पौर्णिमा निमित्त महाप्रसादाचे आयोजन तसेच गौतम बुद्ध यांनी मार्गशीष महिन्यातील पौर्णिमेला ग्रृह त्याग केला होता त्यानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. चंद्रकांत संनदी रा.दत्तवाड यांनी गौतम बुद्ध यांची शिकवण तसेच त्यांचे विचार आचरण करण्याची गरज आहे. असे ते बोलताना म्हणाले गौतम बुद्ध यांची संपूर्ण माहिती त्यांनी कार्यक्रमांमध्ये सांगितली. बौद्ध समाजाला नेहमी सहकार्य करणारे दतवाड गावचे सुपुत्र गणेश शिदनाळे यांचा मार्गशीष महिन्यातील पौर्णिमेला त्यांचा जन्म झाला त्यानिमित्त बौद्ध समाजातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. नेहमी यांचे सहकार्य असते. यावेळी बौद्ध समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.अन्नदान चा कार्यक्रम ठेवण्यात आला यावेळी शाहू किला क्रीडा सांस्कृतिक मंडळाचे कार्यकर्ते, उपासक, उपासिका व गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

युवकांनी नवीन वर्ष धुंदीत नव्हे तर शुद्धीत साजरे करावे : मारुती बनसोडे

नळदुर्ग/प्रतिनिधीः येणारे नवीन वर्ष हे युवकांनी धुंदीत नव्हे तर शुद्धीत साजरे करावे तरच आपली आर्थिक, सामाजिक परिस्थिती बदलेल याची जाणीव ठेवावे असे मत नशाबंदी मंडळ महाराष्ट्र चे धाराशिव जिल्हा संघटक मारुती बनसोडे यांनी व्यक्त केले आहे. दि.३० डिसेंबर रोजी बालाघाट शिक्षण संस्थेच्या कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नळदुर्ग ता. तुळजापूर येथे आयोजित नवीन वर्ष धुंदीत नव्हे शुद्धीत साजरे करा या कार्यक्रमात ते बोलत होते.कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. सुभाष राठोड, प्रा. डॉ. सचिन देवधर व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्ती चा संकल्प केला . मारुती बनसोडे यांनी नशाबंदी मंडळाचे कार्य व धाराशिव जिल्ह्यात सुरु असलेले काम या बाबत माहिती दिली व सर्व युवकांनी या कामात सहभागी व्हावे असे आवाहन केले प्रा.डॉ. सुभाष राठोड यांनी समारोप केला

कुमार विद्यामंदिर टाकळीवाडीचे सांस्कृतिक स्पर्धेमध्ये कोल्हापूर जिल्हास्तरीय निवड

टाकळीवाडी /नामदेव निर्मळे :टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील जिल्हा परिषद शाळा कुमार विद्यामंदिर या शाळेतील विद्यार्थ्यांनी लाटवाडी येथे संपन्न झालेल्या पं. स. शिरोळ आयोजीत तालुकास्तरीय सांस्कृतिक स्पर्धेत नाटयीकरण स्पर्धेत मोठया गटात विद्या मंदिर टाकळीवाडी प्रथम क्रमांक मिळवून जिल्हा स्तरीय स्पर्धेत निवड. जिल्ह्याला करणार शिरोळ तालुक्याचे प्रतिनिधित्व.

सहभागी विध्यार्थी, तसेच शाळेचे मुख्याध्यापक ,सर्व शिक्षक ,शिक्षिका, यांचे मोलाचे योगदान लाभले. सर्वत्र यांचे कौतुक होत आहे. विशेष मार्गदर्शन छाया कांबळे मॅडम यांचे मोलाचे योगदान लाभले.

कर्नाटक राज्यातील सिनेसृष्टीतील दिग्गज अभिनेते केले सोलापूरच्या दिव्यांग गायक रेवणसिद्ध फुलारीचे कौतुक

डी बॉस दर्शन अभिनयाचा काटेर चित्रपटाच्या प्रि रिलीज इव्हेंट व्यासपीठावर रेवणसिद्धचे गायन

अक्कलकोट/प्रतिनिधीः तालुक्यातील तोळणूर येथील दिव्यांग गायक रेवणसिद्ध फुलारी यांचे नुकतेच कर्नाटक राज्यातील मंड्या जिल्ह्यात बॉईज कॉलेज मैदानावर पार पडलेल्या चॅलेंजिंग स्टार डी बॉस दर्शन अभिनयाचा बहुप्रतिक्षित आणि बहु चर्चित काटेर चित्रपटाच्या प्रिरीलिज इव्हेंट व्यासपीठावर गायन करून उपस्थित सिने रसिकांचे वाहवा मिळवत सिनेसृष्टीतील दिग्गज कलाकारांनी कौतुक करत पुढील संगीत क्षेत्रातील गायन करण्यासाठी शुभेच्छा दिले.

रेवणसिद्ध फुलारी तोळणूर सारख्या एक छोट्याशा खेडेगावातून संगीत क्षेत्रात कोणताही अनुभव नसताना दिव्यांग असूनही फक्त आणि फक्त जिद्दीच्या आणि प्रयत्नांच्या जोरावर कमी कालावधीत सिनेक्षेत्रात मोठी उडी मारून चित्रपटाच्या प्रिरिलिज इव्हेंट मध्ये मोठ्या व्यासपीठावर देशातील दिग्गज कलाकार आणि संगीत क्षेत्रातील सुप्रसिद्ध गायिका स्टार सिंगर मंगली यांच्यासोबत व्यासपीठावर गायन करून दिग्गज कलाकारांकडून प्रशंसा मिळवली.विशेष म्हणजे स्टार सिंगर मंगली यांनी रेवणसिद्धाच्या गायनाच्या कौतुक करून शुभेच्छा दिल्या. या वेळी डी बॉस दर्शन यांनी स्वतः अभिनय केलेल्या नम्म प्रितिय रामू चित्रपटातील नन्नेदे बानली रेक्केया तेरेयो बण्णदा हक्किगळे या गाण्यावर मंत्रमुग्ध होवून भावूक झाले होते.गाणे संपल्यावर स्वतः दर्शन यांनी रेवणसिद्धच्या पाठ थोपटून अभिनंदन करून सिने क्षेत्रातील सर्व नव्या अभिनेत्यांचे,कलाकारांचे परिचय करून देत स्वागत केले.कन्नड सिनेसृष्टीतील जेष्ठ अभिनेत्री मालाश्री,श्रुती, सुमलता,रोकलाईन व्यंकटेश,आराधना,मेघना शेट्टी, बृंदा आचार्य,धनाविर, यश सूर्य,अभिषेक अंबरीश, चिक्कण्णा ,कुमार चंद्रू, वी. हरिकृष्णा, जडेशा, मास्ती,पूनित आर्या,महेश मदगज,मास्टर रोहित आदी समवेत सिनेसृष्टीतील कलाकारांनी ,आणि उपस्थित डी बॉस दर्शन यांच्या चाहत्यांनी रेवणसिद्ध फुलारी यांचे गायनाचे कौतुक केले.

कलेक्टर, एस.पी, यांच्या हस्ते होणार ज्येष्ठांचा सन्मान

कळंब/प्रतिनिधी : पिंपळगाव डोळा अमृत महोत्सवी सोहळ्यात धाराशिव जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे व पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते पिंपळगाव(डोळा) येथील शंभर ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात येणार असल्याचे संयोजन समिती चे अध्यक्ष महादेव महाराज आडसुळ यांनी माहिती दिली. सा.साक्षी पावनज्योतचे आधी स्वीकृती

धारक संपादक सुभाष द घोडके यांच्या एकसस्टी निमित्त कळंब तालुक्यातील मौजे पिंपळगाव (डोळा) येथील ७५ वर्षे पूर्ण केलेल्या शंभर ज्येष्ठ नागरिकांचा अमृत महोत्सवी सोहळा दिनांक ९ जानेवारी २०२४ रोजी आयोजित करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना निमंत्रण देण्यासाठी गेलेल्या शिष्टमंडळात संपादक सुभाष द घोडके, कार्यक्रमाचे अध्यक्ष सुखदेव (नाना)टेकाळे, संयोजन समिती चे अध्यक्ष ह भ प महादेव महाराज आडसुळ , कार्याध्यक्ष बंडू आबा ताटे, सदस्य बालाजी खंडागळे, शिवशाहीर बंडू खराडे आदींचा समावेश होता

डी.व्ही.पी पंढरपूर मॅरेथॉनची पहिली आढावा बैठक आयोजित

पंढरपूर/प्रतिनिधीः रनर्स असोशियन पंढरपूर तर्फे रविवार ४ फेब्रुवारी २०२४ रोजी आयोजित होणाऱ्या चौथ्या ऊत्झ पंढरपूर मॅरेथॉन ची पहिली आढावा बैठक 'विठ्ठल इन' या ठिकाणी आयोजित करण्यात आली.संस्थेचे सचिव बालाजी शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रथमच यावर्षी होणाऱ्या मॅरेथॉनचे रजिस्ट्रेशन ऑनलाईन मार्फत केले जाणार आहे. ऑनलाईन रजिस्ट्रेशनची मुदत २० जानेवारी २०२४ पर्यंत आहे. स्पर्धेची सर्व माहिती अध्यक्ष भारत ढोबळे व खजिनदार विश्र्वंभर पाटील यांनी सांगितली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष पंढरपूर तालुका क्रीडा अधिकारी श्री मोहन यादव सरांनी सर्व क्रीडा शिक्षकांना व क्रीडाप्रेमींना आपल्या शाळेतील , परिसरातील धावपटूंना सहभागी करून घेण्याचे आव्हान केले. या कार्यक्रमाला रनर्स असोसिएशन पंढरपूरचे सर्व संचालक, सदस्य व स्त्री-पुरुष धावपटू उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सौ.संगीता पाटील व आभार उपाध्यक्ष डॉ. श्री मंदार सोनवणे सर यांनी केले.

मातोश्री ईश्वरामा विद्यालयात क्रीडा सप्ताहास उत्साहाने सुरुवात

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपुरातील मातोश्री ईश्र्वरा अम्मा महाविद्यालय क्रीडा सप्ताहाची मोठ्या उत्साहाने सुरुवात करण्यात आली यावेळी बोलताना खेळामुळे विश्र्लेषण कौशल्य बरोबर विचारशक्ती सुधारणा आत्मविश्र्वास वाढण्यास मदत होते असे प्रतिपादन प्राचार्य सौदागर झांबरे यांनी केले श्री रुक्मिणी विद्यापीठ संचालित मातोश्री ईश्र्वर रामा विद्यालय पंढरपूर या प्रशालीच्या २०२३ क्रीडा सप्ताहाच्या उद्घाटन समारंभ देणे मनोगत व्यक्त करताना म्हणाले

प्रारंभी क्रीडा ज्योतीचे दीप प्रज्वलन फॅन्सी रे सांगलीचे मालक उद्योगपती रंजीत सावंत यांच्या शुभहस्ते करून क्रीडा सप्ताहाची सुरुवात केली यामध्ये सामूहिक वैयक्तिक खेळाबरोबर कवायत मनोरे यांचाही यामध्ये समावेश असल्याचे प्रास्ताविकता क्रीडा शिक्षिका सरदार कुमोदिनी मानसिंग यांनी सांगितले यावेळी प्रशालेचे विद्यार्थिनी आकांक्षा खोत यांनी प्रशालेस मुलांना खेळांसाठी दोरी उड्या भेट दिल्या. खेळांचे महत्त्व सांगताना प्राचार्य नंदिनी गायकवाड म्हणाल्या की विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांची सर्वांगीण वाढ आणि विकास यासाठी खेळ आवश्यक असून विद्यार्थी दहशतच खेळामुळे नेतृत्व जबाबदारी संयम शिकण्यास मदत होऊन यातूनच मुलांच्या बौद्धिकतेचा विकास होतो असे सांगितले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विभावरी डुबल यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माधुरी बोडके सविता लोखंडे राहण कादारी यांचे सहसृष्टी लोंढे निकिता कदम या विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले

तहसीलदार कणसे यांनी मोहोदगावच्या जडवाहतुकीची केली पाहणी

पंढरपूर/प्रतिनिधीः मोहोळ तालुका सांगोला या गावातून चालू असणारी जड वाहतूक बंद करण्यासंदर्भात पत्रकार पवन बाजारे व ग्रामस्थ यांची अनेक दिवसाची मागणी असल्यामुळे या संदर्भात दि २८ डिसेंबर गुरुवार रोजी सकाळी अकरा वाजता सांगोल्याची तहसीलदार कणसे साहेब यांनी महोद गावातील मेन चौकामध्ये येऊन जड वाहतुकीची पाहणी केली यावेळी महोद गावची ग्रामसेवक बाळासाहेब शिंदे ग्रामपंचायत सदस्य दिलीप नागणे कैलास खबाले अरुण नागणे नवा सरतापे अशोक येडगे लिंगराज येडगे आप्पा बाबर पत्रकार पवन बाजारी तसेच इतर सर्व ग्रामस्थ यांनी प्रमुख प्रामुख्याने में चौकातील जड वाहतुकीबद्दल वाहतूक कोंडी तसेच यापूर्वी झालेल्या अपघाता संबंधी सविस्तर तक्रार तहसीलदार साहेब यांच्या कडे करून यावरती ताबडतोब ही मोठी जड वाहतूक बंद करण्याचा निर्णय झालाच पाहिजे असे ठामपणे सांगितले व मागणी केली तसेच यावेळी संबंधित मोहोळ ग्रामपंचायतचे ग्रामसेवक शिंदे यांनी ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सदस्य वाद्यांची जड वाहतूक बंद करण्यासंदर्भात केलेल्या ग्रामपंचायत ठराव निवेदन तहसीलदार साहेब यांना सर्व ग्रामपंचायतच्या वतीने देण्यात आले तरी या संदर्भात तहसीलदार यांनी लवकरच याबाबतीत जड वाहतो बंद करण्यासंदर्भात संभाजी विभागाला पाठपुरावा करून पुढील कार्यवाही लवकरच केली जाईल असे आश्र्वासन दिले यावेळी महोद गावातील या पक्षाचे राजकीय सामाजिक कार्यकर्ते तसेच हॉटेल व्यवसायिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

कल्याणशेट्टी शिक्षण संकुलनात विज्ञान प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद

अक्कलकोट/प्रतिनिधीः महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालयाच्या कै पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या उद् घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष व कर्तृत्ववान आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी हे होते, तर उद् घाटक म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी मा. विलास यामावार हे उपस्थित होते. प्रमुख उपस्थिती म्हणून

संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी,संचालिका सौ शांभवी कल्याणशेट्टी, सचिव भिमराव साठे संचालक मुकुंद पत्की, संचालक मल्लिनाथ मसुती,सी. इ.ओ. सौ रुपाली शहा,ज्युनियर कॉलेज प्रमुख सौ पूनम कोकळगी, डॉ विपुल शहा प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी हे उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते संस्थापक कै पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलित करून विज्ञान प्रदर्शनाचे उदघाटन करण्यात आले. यावेळीं विदयार्थी निर्मित वंदे भारत एक्स्प्रेस रेल्वे मॉडेल व माहिती, चांद्रयान ३ वर्किंग मॉडेल, टुवड्र्स ग्रीन एनर्जी वर्किंग मॉडेल, रोबोटिक वर्किंग मॉडेल, स्मार्ट इरिगेशन फॉर फार्मर्स मॉडेल, जेनेटिक इंजिनिअरिंग वर्किंग मॉडेल, रेव्हलेशन इन अग्रीकलचर मॉडेल, रामानुजन मॅथस पार्क,जी एस टी ची ओळख, गणितीय समीकरण, घनफळाचे उपयोजन, वर्ल्ड हेरिटेज साइट फॉर्म इंडीया, लोकसाहित्य व संस्कृती, महाराष्ट वेषभूषा, पत्रकारीता,रेडीओ सहिंता,बेटी युग,किल्ल्यांचे देखावे, खंड व महासागर, पृथ्वीचे अंतरंग तसेच क्रीडाविषयक मॉडेल इत्यादी साहित्याची अतिशय व्यवस्थित मांडणी करण्यात आली होती. उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावार व आमदार सचिन कल्याणशेट्टी व मान्यवरांनी सर्व साहित्य पहात विद्यार्थ्यांसी संवाद साधून त्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक केले. प्रदर्शन पाहण्यासाठी तालुक्यातील अनंत चैतन्य प्रशाला हन्नूर, श्री शिवचलेश्र्वर प्रशाला मैंदर्गी, माध्यमिक आश्रम शाळा कोन्हळी, विश्र्वा इंटरनॅशनल स्कूल, जि प मराठी शाळा बागेहळळी, जि प मराठी शाळा लक्ष्मीनगर, लायन्स क्लब प्राथमिक स्कूल, काशिरायाकाका पाटील प्रशाला,अँग्लो उर्दू हायस्कूल या शाळेचे विद्यार्थी, शिक्षक, व पालकांनी या प्रदर्शनाचा आनंद घेतला. हे प्रदर्शन यशस्वी होण्यासाठी पूजा कडबगावकर, गौरीशंकर कोनापुरे, दिपक गंगोंडा,सागर मठदेवरू सलोनी शहा ,सिद्रामप्पा पाटील, मनिषा शिंदे, विद्या बिराजदार, निशिगंधा कोळी, कल्पना स्वामी, यांनी प्रयत्न केले, या कार्यक्रमास प्राथमिकचे मुख्याध्यापक सुरेश आवटे ,निखील भालेराव, खंडेराव घाटगे, प्राध्यापक, शिक्षक ,पालक व कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत ठाणे शहरात संपूर्ण स्वच्छता मोहीम

स्वच्छता मोहीम लोकचळवळ व्हावी : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

ठाणे : संपूर्ण स्वच्छता मोहीम ही लोकचळवळ व्हावी, हे अभियान मुंबईसह एमएमआरडी क्षेत्र आणि टप्प्याटप्प्याने संपूर्ण राज्यभर राबविण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलेमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतील संपूर्ण स्वच्छता मोहिमेची सुरूवात आज वागळे प्रभाग समिती कार्यक्षेत्रातून करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. या मोहिमेत मुख्यमंत्री स्वतः सहभागी झाले होते. यावेळी त्यांच्यासह महापालिका आयुक्त अभिजीत बांगर, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी महापौर नरेश म्हस्के, माजी नगरसेवक अशोक वैती, एकनाथ भोईर, योगेश जानकर, डॉ. जितेंद्र वाघ, एकता भोईर, संध्या मोरे, शिल्पा वाघ, मनिषा कांबळे, महापालिकेचे अधिकारी -कर्मचारी, ठाणे शहरातील ज्येष्ठ नागरिक संघ, भजनी मंडळे, नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, अनिरुद्ध बापू सेवा मंडळ, संत निरंकारी सेवा मंडळ, स्वामी समर्थ सेवा मंडळ, विविध महाविद्यालयांचे एन.एस.एस, एन.सी.सी चे विद्यार्थी, शालेय विद्यार्थी यांनीही आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.मुख्यमंत्री श्री. शिंदे पुढे म्हणाले, ठाण्यातील प्रदूषण तुलनेने कमी असून ते आणखी कमी करण्यासाठी जिथे जिथे जागा मिळेल तेथे झाडे लावून हरीत पट्टे तयार करावेत जेणेकरुन ऑक्सिजन पार्क तयार होतील. तसेच मियावाकी पध्दतीने वृक्षलागवड करुन शहरात जंगले तयार करावीत. त्यामुळे हवेतील प्रदूषण कमी होण्यास मदत होईल. जिथे स्वच्छता असेल तेथे लोक कचरा टाकत नाही. आज बीएमसी पाईपलाईन येथे साठलेला कचरा साफ केला जातो आहे, त्याठिकाणी ग्रीन पॅच तयार करुन तो परिसर हिरवागार करा, जेणेकरुन त्याचे दृश्य स्वरुप नागरिकांना दिसेल.

ठाण्यातील वाहतूक कोंडीचा त्रास नागरिकांना होवू नये, यासाठी वाहतुकीचे नियोजन करावे, त्याचप्रमाणे फेरीवाल्यांना हॉकर्स झोनमध्ये जागा उपलब्ध करण्याचे नियोजन करावे, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. स्वच्छता अभियानाचे ठाणे महानगरपालिकेने केलेले नियोजन हे उत्कृष्ट असल्याचे मुख्यमंत्र्यांनी विशेषतत्वाने नमूद केले. त्यांनी यावेळी जयेश गायकवाड व अनिता शिरसाट या सफाई कर्मचाऱ्यांचा प्रातिनिधीक स्वरुपात सन्मान केला.

मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी तीन हात नाक्यावरुन मॉडेला नाका मार्गे वागळे मुख्य रस्ता, १६ नं. येथील बीएमसी पाईपलाईनवरील पूल, रोड नं. २१, रोड नं २२ येथील शिवसेना शाखा येथून चालत सर्व ठिकाणी सुरू असलेल्या स्वच्छता मोहिमेची पाहणी केली. यावेळी त्यांनी स्वत:ही काही ठिकाणी रस्त्यांची सफाई केली तसेच फूटपाथवर पाण्याची फवारणी करुन फूटपाथ स्वच्छ केले.

या अभियानात सहभागी झालेल्या भजनी मंडळ, स्वच्छता स्वयंसेवक, ज्येष्ठ नागरिक संघ, एन.सी.सी, एन.एस.एस, शालेय विद्यार्थी तसेच विविध धार्मिक संस्थामार्फत सहभागी झालेल्या स्वयंसेवकांना भेट देवून त्यांच्याशी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी संवाद साधला. स्वच्छता अभियानाच्या नियोजनाबाबत ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की, आज वागळे इस्टेट प्रभागापासून या मोहिमेचा प्रारंभ झाला असून दर शनिवारी एक याप्रमाणे २४ फेब्रुवारी २०२४ पर्यंत प्रत्येक प्रभाग समितीत हे अभियान राबविले जाणार आहे. या अभियानात मार्केट, गल्ल्या, बसस्थानके, फूटपाथ, दुभाजक, नाले, मैदाने, कचरा जमा होणारी ठिकाणे, विसर्जन घाट अशा सर्व सार्वजनिक ठिकाणांचा समावेश करण्यात आला आहे. या अभियानात एकूण २ हजार ५०० महापालिकेचे कर्मचारी, १ हजार ७९७ स्वच्छता कर्मचारी, विविध संस्थाचे स्वयंसेवक असे ५ हजारांहून जास्त मनुष्यबळ या अभियानात सहभागी झाले असून त्यांच्यामार्फत सफाई केली जात आहे. सफाईसाठी लागणारी सर्व यंत्रसामुग्री, पाण्याचे टँकर, प्रथमोचाराची साधने, ॲम्ब्युलन्स अशा सेवा त्यांना पुरविण्यात आल्या आहेत.

नविन वर्षात दि.८ जानेवारी रोजी रिपब्लिकन पक्षाचे बोरिवलीत उत्तर भारतीय संमेलन

मुंबई : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) उत्तर भारतीय आघाडी च्या वतीने नविन वर्षात येत्या दि.८ जानेवारी २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता बोरिवली पश्चिम गोराई येथील गणेश मंदिरा जवळच्या गोराईचा राजा मैदान येथे उत्तर भारतीय संमेलनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती रिपब्लिकन पक्षाचे

महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस गौतम सोनावणे,उत्तर भारतीय आघाडी महाराष्ट्र अध्यक्ष श्यामधर दुबे, उत्तर भारतीय आघाडीचे मुंबई अध्यक्ष हरिहर यादव, उत्तर भारतीय आघाडी चे महाराष्ट्र राज्य सरचिटणीस रमेश गौड यांनी दिली आहे.आज मुंबई मराठी पत्रकार संघात झालेल्या पत्रकार परिषदेत रिपाइंच्या नेत्यांनी ही माहिती दिली.

रिपब्लिकन पक्षाने नेहमी उत्तर भारतीयांना साथ दिली आहे. मुंबईतील उत्तर भरतीयांच्या झोपड्या घरांच्या पात्रतेसाठी; फेरीवाले ; टॅक्सीवाले; कष्टकरी कामगार म्हणून मुंबईत रोजीरोटी साठी कष्ट करणाऱ्या उत्तर भारतीयांना नेहमी त्यांच्या अडीअडचणीत रिपब्लिकन पक्षाने साथ दिली आहे.त्यामुळे मुंबईतील उत्तर भारतीयांचा रिपब्लिकन नेते रामदास आठवले आणि रिपब्लिकन पक्षावर प्रचंड विश्र्वास आहे. रिपब्लिकन पक्षाशी असलेल्या विश्र्वासाच्या नात्यामुळे उत्तर भारतीयांना रिपब्लिकन पक्षाच्या संघटनेत सामावून घेणार आहोत तसेच आगामी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षातर्फे उत्तर भारतीयांना उमेदवारी देखील देण्याचे धोरण पक्षाध्यक्ष ना.रामदास आठवले यांनी निश्र्चित केल्याची अधिकृत घोषणा आज रिपब्लिकन पक्षाचे राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे यांनी केली आहे.

महाराष्ट्रात जेव्हा जेव्हा परप्रांतीयच्या मुद्दयावर उत्तर भारतीयांशी भेदभाव आणि अन्यायाचा,दहशतीचा,संकटांचा प्रसंग आला तेव्हा तेव्हा केंद्रिय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वातील रिपब्लिकन पक्षाने नेहमी पुढे येवून उत्तर भारतीयांना जाहिर पाठिंबा दिला आहे.राष्ट्रीय नेते रामदास आठवले यांच्या नेतृत्वावर मुंबईतील उत्तर भारतीयांचा प्रचंड विश्र्वास आहे.त्यामुळे शेकडो उत्तर भारतीय नागरिक येत्या दि.८ जानेवारी २०२४ रोजी उत्तर भारतीय संमेलनात उपस्थित राहुन रिपब्लिकन पक्षात प्रवेश करणार आहेत अशी माहिती रिपाइं चे उत्तर भारतीय आघाडीचे महाराष्ट्र अध्यक्ष श्यामधर दुबे आणि मुंबई अध्यक्ष हरिहर यादव ;

उत्तर भारतीय आघाडी चे राज्य सरचिटणीस रमेश गौड यांनी दिली आहे.

केंद्रिय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांच्या नेतृत्वातील रिपब्लिकन पक्षात उत्तर भारतीयांना जोडण्यासाठी रिपब्लिकन पक्षात उत्तर भारतीय आघाडीची स्थापना होऊन उत्तर भारतीय आघाडी चांगले काम करीत असल्याचे प्रतिपादन रिपाइंचे महाराष्ट्र राज्य सरचिटणीस मा.गौतम सोनवणे यांनी केले.

गोगांव येथील शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी सुधीर जगताप

अक्कलकोट/प्रतिनिधीः जिल्हा परिषद शाळा गोगांव येथील शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी सुधीर बलभीम जगताप, उपाध्यक्षपदी शोभा शरणबसपा मुळजे यांचे बिनविरोध निवड करण्यात आले

जिल्हा परिषद शाळा गोगांव येथे पालक सभा घेण्यात आले यावेळी ग्रामपंचायत जेष्ठ सदस्य प्रदीप जगताप, उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, शालेय व्यवस्थान समिती अध्यक्ष आकाश गायकवाड, मुख्याध्यापक दयानंद चोळे,महादेव चव्हाण सर,यांच्या प्रमुख उपस्थितीत सभा घेण्यात आले यावेळी नवीन शालेय व्यवस्थापन समिती पुढील प्रमाणे गठीत करण्यात आले अध्यक्ष सुधीर जगताप, उपाध्यक्ष सौ. शोभा मुळजे, सदस्य श्रीदेवी गायकवाड, राजेश्री धनशेट्टी, अस्मोद्दिन नदाफ, नामदेव बनसोडे, सौ. चंद्रकला

गायकवाड, स्वाती निळ, मंजुनाथ जिरगे, शिक्षणतज्ञ ज्योती आलूरे, ग्रामपंचात प्रतिनीधी सौ. महादेवी होळे असे निवड करण्यात आले

यावेळी बोलताना कमलाकर सोनकांबळे म्हणाले की, नव्या अध्यक्ष व सर्व सदस्य यांनी शैक्षणिक गुणवंत वाढवण्यासाठी लक्ष दिले पाहिजे यासोबत जिल्हा परिषद शाळेमध्ये वेळोवेळी भेट देऊन शैक्षणिक अडचण, शिक्षक, विद्यार्थी यांचे समस्या जाणून घेतले पाहिजे व गोगावचे शैक्षणिक गुणवंत तालुक्यात येण्यासाठी सर्व शिक्षकांनी प्रयत्न केले पाहिजे त्यांना जे शैक्षणिक कामासाठी आवश्यक असणारे बाबी पूर्ण करण्यासाठी सदैव ग्रामपंचायत तयार आहे , मुलाचे भविष्य घडविण्याचे काम शिक्षकांनी केले पाहिजे,

शाळेच्या विकास कामासोबत शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी सरपंच वनिता सुरवसे यांनी सतत प्रयत्नशील असतात येत्या काळात जिल्हा परिषद शाळेस ह्युमन सोशल डेव्हपमेंट असोसिएशन महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष गोगांवचे सुपुत्र कैलास बनसोडे यांनी सी एस आर फडींग माध्यमातून शाळेस दहा संगणक व चाळीस पन्नास खुर्च्या भेट देणार आहेत,

पालक व गावातील लोकांना विनंती आहे डिजिटल शाळा करण्यासाठी सर्वांनी मदत करावे यावेळी सूत्रसंचालन शंकर कारभारी सर यांनी केले आभार पुडलिक वाघमारे यांनी केले यावेळी नवीन अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य यांचे सत्कार मुख्याध्यापक दयानंद चोळे, प्रदीप जगताप, उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी केले, सरपंच सौ. वनिता सुरवसे यांनी नवीन अध्यक्ष ,उपाध्यक्ष, सदस्य यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिले यावेळी पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते

टी.ए .पाटील इंग्लिश मीडियम व व राईज प्री स्कूलचा वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात

भिवंडी/मिलिंद जाधव : टी.ए .पाटील इंग्लिश मीडियम स्कूल व राईज प्री स्कूल पडघे यांचा वार्षिक क्रीडा महोत्सव दिनांक २८ ते ३० डिसेंबर २०२३ रोजी संपन्न झाला. दिनांक २८ रोजी स्पर्धेची सुरूवात करून विविध क्रीडा प्रकार घेण्यात आले. तसेच या क्रिडा महोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे दिनांक २९ डिसेंबर रोजी आयोजित केलेली 'पडघा मिनी मॅरेथॉन' स्पर्धा.या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती म्हणजे शिवसेना उपनेते प्रकाश पाटील ,पडघा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप गीते, जीवन विद्या प्रसारक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष कुंदन पाटील ,उपाध्यक्ष शशांक तांबोळी, सचिव अविनाश महाजन ,सहसचिव संजय पटेल ,खजिनदार यशवंत गायकवाड , पडघा ग्रामपंचायत सदस्य डॉ. संजय पाटील व इतर संस्था पदाधिकारी उपस्थित होते.

या मॅरेथॉन स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना आणि शिवसेना उपनेते प्रकाश पाटील ,पडघा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप गीते यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी पालक ,विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तसेच पडघ्यातील नागरिकांना खेळाचे महत्व व त्याचे फायदे हा संदेश कार्यक्रमाद्वारे देण्यात आला.

श्री शिव महापुराण कथेचा सहावा दिवस लाखो भक्तांच्या उपस्थितीत मंगलमय वातावरणात संपन्न

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूरच शिवभक्त श्री संत नरहरी सोनार महाराज यांची कथा ऐकताना आज हरिहर भेटीचा साक्षात्कार घडला..

श्री शिव महापुराण कथेचा सहावा दिवस लाखो भक्तांच्या उपस्थितीत मंगलमय वातावरणात संपन्न झाला.श्री शिव महापुराण कथेच्या सहाव्या दिवशी श्री विठ्ठल सह.साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत अबा पाटील यांनी सहकुटुंब पंडीत प्रदीप मिश्रा महाराजांचे स्वागत केले. आरती व पूजन करून कथेस प्रारंभ झाला.. पंढरपूर आणि भारतातल्या अनेक राज्यातील लाखो भाविक थंडी उन्हाची पर्वा न करता सहभागी होत आहेत..

विठ्ठल आणि शिवभक्तीचा हा संगम न भूतो न भविष्यती असाच ठरला!! कथा सोहळ्यासाठी आमदार श्री.यशवंतजी माने, आमदार श्री.संदीपजी क्षीरसागर, दामाजी सह.साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन तानाजी खरात, लाइफलाईन हॉस्पिटलचे डॉ. संजय देशमुख यांच्या सह वकील, आर्यविश्र्व कोमटी समाज, परीट समाज, नाभिक समाज यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून महाराजांचे दर्शन घेतले.

स्वेरीच्या अथर्व शिंदे यांना रायफल शूटिंग स्पर्धेत सुवर्णपदक

पंढरपूर/प्रतिनिधीः शैक्षणिक क्षेत्रात विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना गुणवत्तेत परिपक्व बनवण्याचा ध्यास घेतलेली गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील 'स्वेरी' ही शिक्षण संस्था केवळ शैक्षणिक क्षेत्रातच अग्रेसर झाली आहे असे नव्हे तर आता क्रीडा क्षेत्रातही स्वेरी आपली चमकदार कामगिरी करत आहे हे मागील कांही वर्षांपासून दिसून येत आहे. नुकत्याच सोलापूर येथे झालेल्या विद्यापीठ स्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेमध्ये स्वेरीच्या अथर्व आनंद शिंदे यांनी सुवर्णपदक पटकावले. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत सोलापूर येथील सुशीलकुमार शिंदे शारिरीक शिक्षण महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या विद्यापीठ स्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेमध्ये स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विभागाच्या द्वितीय वर्षात शिक्षण घेणारे विद्यार्थी अथर्व आनंद शिंदे यांनी अनुक्रमे ९९,९८,९७,९५,९६ असे टारगेट साध्य करून प्रथम क्रमांकाने विजयी होऊन सुवर्णपदक मिळवले. या विजयामुळे जानेवारी २०२४ मध्ये कुरुक्षेत्र (हरियाणा) मध्ये होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी अथर्व शिंदे यांची निवड झाली

आहे. खेळाची आवड असलेल्या शिंदे यांना सुरवातीपासून स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांची सातत्याने प्रेरणा मिळत आहे त्यामुळे अथर्व यांनी शिक्षणाबरोबरच खेळाकडेही लक्ष केंद्रित केले आणि आपले लक्ष्य गाठले. त्यांना स्वेरीचे क्रीडा मार्गदर्शक प्रा.संजय मोरे यांचेही मार्गदर्शन लाभले. स्वेरीत अत्याधुनिक सुविधा असलेल्या स्वतंत्र जीमची सोय झाल्यामुळे विद्यार्थी सरावाला अधिक वेळ देत असल्याचेही दिसून येत आहे. अथर्व शिंदे यांनी रायफल शूटिंग स्पर्धेमध्ये सुवर्णपदक पटकवल्यामुळे त्यांचा स्वेरीच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी अथर्व यांचे वडील आनंद शिंदे व कार्यालयीन अधीक्षक नागेश ताडे हे उपस्थित होते. रायफल शूटिंग स्पर्धेत सुवर्णपदक मिळविल्यामुळे स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्र्वस्त व पदाधिकारी, कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी अथर्व शिंदे यांचे अभिनंदन केले.

राज्यातील १,३०९ गांवे अनुसूचित क्षेत्रातून वगळण्याचे प्रस्तावित!

नंदुरबार/प्रतिनिधीः महामहिम राष्ट्रपती यांनी १९५० रोजी अनुसूचित क्षेत्रातील गावांची यादी घोषित केली.या यादीतील मूळ अनुसूचित क्षेत्रात येणारी ५,७४६ गावांपैकी १,३०९ गांवे सुधारित अनुसूचित क्षेत्रातून वगळण्याचा प्रस्ताव आदिवासी विकास विभागाने तयार केलेला आहे.

या संदर्भात आदिवासी विकास विभागाचे मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांचे अध्यक्षतेखाली २३ नोव्हेंबर २०२२ रोजी मुंबई येथे बैठक पार पडली. या बैठकीतील निर्देशानुसार अनुसूचित क्षेत्राच्या पुनर्रचनाचा प्रस्ताव सुधारित करण्याचे द्रुष्टीने काम हाती घेण्यात आले आहे.महामहिम राष्ट्रपती यांनी (भाग क राज्य) आदेश १९५० दि. २३ जानेवारी १९५० आणि अनुसूचित क्षेत्र (भाग ख राज्य) आदेश १९५० दि.७ डिसेंबर १९५० नुसार अनुसूचित क्षेत्रात सदर गांवे समाविष्ठ केलेली आहेत.अनुसूचित क्षेत्राचे पावित्र्य कायम ठेवण्यासाठी जी गांवे १९५० रोजी अनुसूचित क्षेत्रात घोषित केलेली आहे.त्यात शासनाला एखादे क्षेत्र वगळून बदल करता येत नाही. याच कारणास्तव ही गांवे पुनश्र्च २ डिसेंबर १९८५ च्या यादीत घ्यावी लागली आहे.

सद्यस्थितीत राज्यातील १३ जिल्ह्यातील २३ तालुके संपूर्ण व ३६ तालुके अंशतः अनुसूचित क्षेत्रात येत असून यातील महसूली गावांची संख्या जनगणना २०११ नुसार ५७४६ इतकी आहे. अनुसूचित क्षेत्राच्या सुधारित प्रस्तावात या १३ जिल्ह्यातील १,३०९ गांवे वगळण्याचे प्रस्तावित आहे.तर नव्याने समाविष्ट करण्यासाठी १,२९३ गांवे प्रस्तावित आहे.नवीन प्रस्तावित गावात वाड्या, पोडं यांचा समावेश आहे.गावाच्या व्याख्येत येणाऱ्या वाडी - पाडे, वस्ती - वस्त्या, तांडे व त्यांचा समुह घोषित अनुसूचित क्षेत्रात येतात.पण यासंबंधी १९५० पासून आजपर्यंत नोटीफिकेशन काढण्यात आलेले नाहीत.

जिल्हानिहाय गांवे व वगळण्यात येणारी गांवे
जिल्हा/अनु.क्षेत्रातील मूळ गावे/ वगळण्यासाठी प्रस्तावित गावे.

१) नंदुरबार / ८३६ / ५८
२) धुळे / १४२ / १८
३)जळगाव/ ५८/ ७
४) पुणे / १२१ / २४
५)अमरावती / ३५१ /२६
६) अहमदनगर / ९४/ ६
७) चंद्रपूर /१८२/ १११
८)पालघर / ८०६ / १२५
९)गडचिरोली / १४०७/ २८६
१०)नाशिक / ८८८ / १५६
११) ठाणे / ३८० / २५३
१२) यवतमाळ / ३२९/१३६
१३) नांदेड / १५२/ १०३
एकूण – ५७४६ / १३०९

घटनेच्या पाचव्या अनुसूचितील भाग ग मधील परंतुक 'ख' च्या तरतुदीनुसार अनुसूचित क्षेत्रात फेरबदल केवळ सीमांच्या दुरुस्तीच्याच रुपाने करता येतो.आणि परंतुक 'घ'नुसार पुर्वोक्तवत असेल ते खेरीज करुन बदल करता येत नाही.याशिवाय ढेबर आयोग ,भुरीया आयोग यांच्या शिफारशी काळजीपूर्वक लक्षात घ्यावात. चुकीच्या पद्धतीने अनुसूचित क्षेत्रात फेरबदल करता येणार नाही. शासनाला पत्रव्यवहार केलेला आहे.

नितीन तडवी जिल्हाध्यक्ष ट्रायबल फोरम नंदुरबार.